भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. १९५/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १५/०४/२०१८

**१) क्रिकेट सामना दरम्यान हारजीतीचा जुगार खेळतांनी मिळुन आल्याने गुन्हा नोंद:-**

दिनांक १३/०४/२०१८ चे २१.०५ वाजता दरम्यान यातील आरोपी ०१ ते १६ यांनी आरोपी क्र. १७ यांचे घरातील पहिल्या व दुस-या माळयावरील घर किरायाने घेवुन त्यामध्ये संगणक / टिव्ही मोबाईल संचाचे मदतीने इंडीयन प्रिमीयम लिग क्रिकेट सामना बॅगंलोर येथे आरसीबी विरूध्द किंग पंजाब ११ चे संघ दरम्यान दि. १३/०४/२०१८ क्रिकेट सामना दरम्यान हारजितीचा जुगार खेळतांनी मिळुन आले त्याचे ताब्यातुन जुगाराचे नगदी १,०४,१३३/रु. साहित्य २५,७४,९११/रु. चा असा एकुण २६,७९,०४४/रु. चा माल जप्त केला. मोक्यावर जप्त मोबाईल मधील काही सिम कार्ड मध्ये बनावटी कागदपत्रांचा उपयोग करून कंपनीची व मुळ कागदपत्र भारत देशाची फसवणुक केल्याचे दिसुन येत आल्याने, सरतर्फे फिर्यादी पोउपनी. गौरखेडे स्था.गु.शा. नागपुर यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ४२०,४६७,४६८,४७१ भादवी. सहकलम ४,५ महाराष्ट्र जुगार कायदा अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. थेरे पोलीस स्टेशन भंडरा हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**२) अल्पवयीन मुलीवर अत्याचार करून जिवे मारण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद:-**

दिनांक २४/०६/२०१७ चे ०६.३० पासुन दि. १२/०४/२०१८ चे ११.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादी अल्पवयीन मुलगी असल्याचे माहीत असुन सुध्दा तीला फुस लावुन लग्नाचे आमीष दाखवुन पांढ-या रंगाचा इंगनेटर मोटार सायकल वर बसवुन शहापुर येथे घेवुन गेला व तीचेवर अत्याचार करून मारहान केली व नंतर लग्नाला नकार देवुन तीला शिवीगाळ करून जिवे मारण्याची धमकी दिल्याने, फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पो.स्टे येथे अप क्र. ०२६८/१८ कलम ३६३,३७६,(आय)(एन), ३२३,५०४,५०६ भादवी सहकलम ४,१२ पोक्सो अॅक्ट २०१२ अन्वये कागदपत्र पो.स्टेला प्राप्त झाल्याने, सरतर्फे फिर्यादी पो.ना भोंगाडे यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन वरठी येथे कलम ३६३,३७६,(आय)(एन),३२३,५०४,५०६ भादवी सहकलम ४,१२ पोक्सो अॅक्ट २०१२ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. राऊत पोलीस स्टेशन वरठी हे करीत आहेत.

**३) मुलीचा विनभंग केल्याने गुन्हा नोद:-**

दिनांक १४/०४/२०१८ चे ०७. ३० वाजता दरम्यान यातील फिर्यादी हा आपले घरी रस्त्याचे कडेला घराकडे तोंड धुत असतांना यातील आरोपीने पिडीत मुलीसी जवळीक साधुन तिचा विनयभंग केल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन वरठी येथे कलम ३५४ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. राऊत पोलीस स्टेशन वरठी हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**४) ट्रक ची डब्ल्यु व्हिलला धडक लागुन नुकसान केल्याने गुन्हा नोद:-**

दिनांक १४/०४/२०१८ चे ०३.३० वाजता दरम्यान यातील आरोपी ट्रक चालकाने त्याचे ताब्यातील वाहन हयगयीने लापरवाहीने चालवुन राष्ट्रीय महामार्ग क्र. ०६ ने नागपुर कडुन रायपुर कडे जात असतांनी ट्रक नाल्या जवळील डब्ल्यु व्हील तोडुन नुकसान केल्याने फिर्यादी रामकृषण महादेव गाढवे वय ४६ वर्ष रा. मुरमाडी सावरी यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम २७९ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. राऊत पोलीस स्टेशन लाखनी हे करीत आहेत.

**५) कॉपर वायरची चोरी :-**

दिनांक १४/०४/२०१८ चे ००१ ते ११.०० वाजता दरम्यान यातील कोणीतरी अज्ञात आरोपीने आयुध निर्माण रेल्वे सायडींग मध्ये लागलेला ओएचई तार (कॉपर वायर) ४५ मिटर लांब ४५ किलो कि. १५,०००/रु. चे चोरून नेल्याने फिर्यादी पुरूषोत्तम समयलाल पाल वय ३८ वर्ष रा. तुमसर यांचे लेखी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३७९ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. गायधने पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**६) विहीरीचे पाण्यात बुडुन इसमाचा मृत्यु :—**

दिंनाक १२/०४/२०१८ चे ०५.०० वाजता ते १४/०४/२०१८ चे ८०.३० दरम्यान यातील मृतक जयप्रकाश अंतु राऊत वय ४७ वर्ष रा. नाकाडोंरी हा फिर्यादीचा काका लागत असुन हा नेहमी प्रमाणे दि. १२/०४/२०१८ चे सकाळी ०५.०० वाजता दरम्यान् शिवमंदीरा कडे फिरण्यास गेला असता, घरी परत न आल्याने, दि. १३/०४/२०१८ ला गुम रजी क्र. १०/१८ चे १३.०८ वाजता नोंद असुन आज दि.१४/०४/२०१८ ला मृतकचा पुतण्या पो.स्टे.ला येवुन लेखी रिपोर्ट दिली की, काका मृतक जयप्रकाश खोजेंद्र अशोक गोपाले यांचे शेतातील विहीरीचे पाण्यात मरण पावला आहे असे फिर्यादी विजय भैय्या राऊत वय ३७ वर्ष रा.नाकाडोंगरी यांचे लेखी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन गोबरवाही येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास तांडेकर पोलीस स्टेशन गोबरवाही करीत आहेत

**७) मृत अवस्थेत इसमाचे प्रेत मिळुन आल्याने मर्ग नोंद :—**

दिंनाक १४/०४/२०१८ चे ०७.०० वाजता दरम्यान यातील मृतक फुलचंद शंकर शेंडे वय ५५ वर्ष रा. इंजीनीयरींग कॉलोनी गणेशपुर याचे प्रेत ग्राम गराडा खुर्द शेतशिवरात मृत अवस्थेत मिळुन आल्याने व मृतक याने कोणतेतरी विष प्राशन करून मरण पावल्याचे फिर्यादीचा संशय असल्याने, फिर्यादी देवचंद शकर शेंडे वय ४९ वर्ष रा. गराडा खुर्द यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन कारधा येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ. मुटकुरे पोलीस स्टेशन कारधा करीत आहेत

**८) किटक नाशक औषध प्राशन करून इसमाचा मृत्यु :—**

दिंनाक १४/०४/२०१८ चे १६.०० वाजता दरम्यान यातील मृतक सचीन उध्दव तिघरे वय ३४ वर्ष रा. संराडी बुज हा त्याचे शेतावर शेतीचे कामाने गेला असता अचानक चक्कर येवुन पडुन तोंडातुन फेस काढीत असतांनाा त्यास औषधोपचारा करीता पिएचसी संराडी बुज येथे प्राथमीक उपचार करून पुढील उचारा करीता ग्रा.रू. लाखांदुर येथे तेथील वैदयकीय अधीकारी यांनी त्यास तपासुन मृत घोषीत केल्याने मृतकने कोणतेतरी किटक नाशक औषध प्राशन करून मरण पावल्याने फिर्यादी योगेश उध्दव तिघरे वय ३७ वर्ष रा. संराडी यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन लाखांदुर येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. बोरखडे पोलीस स्टेशन लाखांदुर करीत आहेत

**९) अवैध दारु /जुगार अडड्यांवर धाडी . :—**

दिनांक १४/०४/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोलीस स्टेशन गोबरवाही,पालांदुर पवनी व लाखांदुर येथे अवैध हातभट्टी +देशी दारू /जुगार अडड्यावर धाडी घालुन एकुण ०६ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन १० लिटर हातभंट्टी दारू किंमती ६,००/रु. व २२ लिटर २३० मिली लिटर देशी दारु किंमती ६,५२७/—रु. तसेच जुगारातुन ४७०/रु. असा एकुण किंमती ७,५९७/—रु. चा माल जप्त क.्ण्यात आला.

**१०) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :—**

दिनांक १४/०४/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण ६५ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून तीन सिटर वाहनाकरीता— ०४ ईतर वाहनांवरती — ६१ केसेस करण्यात आले आहे.

**(मपोउपनि.प्रणती लांजेवार)**
**महिती कक्ष भंडारा**
**दुरध्वनी.क्र. ८८०५६५७२६२**

**प्रति,**

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.